# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १६/०९/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक १६/०९/२००४ रोजी सभा सुचना क्र. १६ दि. १०/०९/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ६) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ७) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ८) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ९) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १०) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ११) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १२) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |
| १३) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १४) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| १५) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १६) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे मी स्वागत करतो. तसेच आपले आयुक्त आर. डी. शिंदे साहेब, उपायुक्त रणखांब साहेब, पाणपट्टे साहेब व प्रशासन, स्थायी समितीचे सर्व सदस्य, कर्मचारी ह्यांचे मला जे सहकार्य लाभले त्यांना सुद्धा मी धन्यवाद देतो आणि ह्याच्यापुढे असेच मला सहकार्य करतील असे बोलून माझे दोन शब्द पुर्ण करतो आणि सभेला सुरूवात करावी.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेब, सभेला सुरूवात करण्याअगोदर आदरणीय सभापती महोदयांनी सर्व स्थायी समिती सभासदांचे मनःपूर्वक अभिनंदन केलेले आहे, त्यांना धन्यवाद दिलेले आहे. मी सुद्धा सभेच्यावतीने सर्व सदस्यांच्यावतीने आदरणीय सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स ह्यांनी एक अतिशय सुंदर काम गेल्या वर्षाच्या आपल्या कार्यकाळामध्ये स्थायी समितीचे सभापती पद म्हणून त्यांनी भूषविले आहे. कोणत्याही प्रकारचा निपक्षपाती न करता त्यांनी प्रामाणिकपणे काम केलेले आहे. तुमच्या सहकार्याबद्दल संपूर्ण स्थायी समितीच्या सदस्यांच्यावतीने मी आपल्याला धन्यवाद व्यक्त करतो आणि पुढील कार्यासाठी आपल्याला शुभेच्छा देतो.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब या ठिकाणी आपली आजची अखेरची सभा आहे आणि आपण जे गेल्या वर्षभरात सर्व सन्मा. सदस्यांना, सर्व अधिका-यांना, सर्व कर्मचा-यांना एक चांगल्या पद्धतीने प्रशासन याठिकाणी चालवलेले आहे, अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात. ठिक आहे. वर्षभरातील कडू गोड आठवणी सगळ्यांच्या मनात राहणारच आहे. पण तरी सभापती म्हणून आपण निश्चितपणे सगळ्यांना

विश्वासात घेऊन याठिकाणी काम केलेले आहे आणि आपला आदर्श याठिकाणी जे नवनिर्वाचित सभापती होणार आहेत आमचे परममित्र ज्येष्ठ सदस्य श्री. मोहनजी पाटील ह्यांनी पहिले सभापती पद भूषविलेले आहे. आपली कारकीर्द त्यांनी जवळून बघितलेली आहे, काही का असे ना! पण आपली कारकीर्द निश्चितपणे चांगली होती आणि आता सन्मा. सभापती होणारे मोहनजी पाटील हे निश्चितपणे पुन्हा एकदा सगळ्यांना विश्वासात घेवून एक दिलाने, एक मनाने काम करतील, यात तिळमात्र शंका नाही. वर्षभरातील आपली कारकीर्द चांगली होती. खरोखरच आपले अभिनंदन करावे तितके थोडेच आहे. आपणांस भावी कारकीर्दीस शुभेच्छा आम्ही व्यक्त करतो. तसेच, आमचे सन्मा. ज्येष्ठ सदस्य आणि सभापती होण्यासाठी जात असलेले श्री. मोहनजी पाटील ह्यांना ही मनःपुर्वक हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**नितीन ठाकूर :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, गेल्या वर्षभरापासून सभापती पद सांभाळल्यापासून सभापती साहेबांनी जे सहकार्य आम्हा सर्व पक्षाच्या सदस्यांना दिले त्याबद्दल आम्ही त्यांचे धन्यवाद करू तेवढे थोडेच आहे. त्याप्रमाणे गेल्या वर्षी स्थायी समिती सदस्य म्हणून मी निवडून आल्यापासून सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स साहेब, आमच्या पक्षाचे अध्यक्ष व माजी सभापती श्री. मोहन पाटील साहेब तसेच काँग्रेस नगरसेवक-सदस्य आताचे उपमहापौर वैती साहेब, बीजेपीचे नगरसेवक, शिवसेनेचे नगरसेवक, आघाडीचे नगरसेवक तसेच आमच्या पक्षाचे नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ह्या सर्वांच्या बरोबर मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त साहेब, उपायुक्त साहेब तसेच अधिकारी वर्ग ह्यांनी जे वर्षभर सहकार्य दिले त्याबद्दल मी स्वतः त्यांचा ऋणी आहे व त्यांनी गेल्या वर्षी जे सहकार्य केले त्या सर्वांचा मी ऋणी असून यावर्षी मी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा सचिव साहेब ह्यांच्याकडे सुर्पूद करत आहे आणि त्यांनी तो राजीनामा स्विकारावा, ही त्यांना नम्र विनंती. तसेच आमच्या पार्टीचे अध्यक्ष श्री. मोहन पाटील साहेब ह्यांना ही मी कॉपी देत आहे. ती त्यांनी स्विकारावी.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, हया अध्यक्षांच्या वेळेला आम्हाला फार कमी वेळ मिळाला. त्यांच्या कमिटीमध्ये व आता आम्ही नवनिर्वाचित सध्याच आलेलो आहोत. परंतु, ज्या दोन-चार स्थायी समितीच्या सभेला आम्ही हजर होतो. त्या कमिटीमध्ये ज्या पध्दतीने अध्यक्षांनी ज्या सभा हाताळल्या आणि सर्व अधिका-यांना घेउन आणि खंबीरपणे त्यांनी नेतृत्व केले, हा कुठलाही प्रश्न घ्यायचा म्हणजे सर्वानुमते झालेला आहे, तर त्याची अंमलबजावणी देखील झाली पाहिजे आणि तो ठराव सर्वानुमते मंजूर ही झालेला आहे. अशी खंबीर भूमिका मला त्यांच्याकडून पहावयास मिळाली आणि ज्या थोडक्या अवधीमध्ये त्यांना त्यांच्या सानिध्यात काम करण्याकरिता जी संधी मिळाली आणि त्यांचे उत्कृष्ट नेतृत्व आणि काम बघून मला समाधान झालेले आहे. त्यांची पुढील कारकीर्द आणखीन यशस्वी व्हावी. ही मनोकामना. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

**गजानन भोईर :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, आम्हाला खुप थोडा वेळ मिळाला, मला वाटते ही चौथी सभा असेल आणि सभापती म्हणून आपण आम्हाला जे प्रेम दिले. आम्ही जी कामे सांगितली, ती परत त्यांनी आम्हाला त्यांच्या कॅबिनमध्ये बोलावून परत परत त्याचा पुर्नोच्चार केला की, आपल्याला त्याठिकाणी जायचे आहे. मागे शाळेच्या बाबतीत त्यांनी आम्हाला तीन तीन वेळा बोलावले. थोड्या वेळात का होईना पण त्यांनी आम्हाला चांगले प्रेम दिले. आता येणारा गणपतीचा सण हे नारायणा त्यांना चांगली बुद्धी देवो, सदबुद्धी देवो. एवढीच मी प्रार्थना करतो आणि मी माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९३ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

आदरणीय सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतोय, या ठिकाणी माझे सहकारी नितीन ठाकूरजी ह्यांनी जो राजीनामा सुपुर्द केला आहे तो ह्या सभेनंतर राजीनामा घ्यावा. सभा सुरू केलेली आहे आणि सभेचा हा विषय झाल्यानंतर तो राजीनामा स्विकारावा.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य नितीन ठाकूर ह्यांनी आपल्याकडे जो राजीनामा दिलेला आहे, मला वाटते की, ह्याच्यामध्ये सदस्यांनी स्वतःहून आपल्याकडे लिहून पाठवलेले आहे तर ते सभेच्या अगोदर पासून

रिजाईन करतात की सभेच्या नंतरपासून रिजाईन करतात हे त्यांच्यावर आहे. मला असे वाटते की तुम्हाला सभा सुरू होण्याच्या अगोदर मिळाले आहे आणि कायद्याच्या रितीने ते सभेच्या अगोदरच स्विकारले म्हणून अगोदर पासूनच तुम्हाला त्यांचे रिजाईन मंजूर करायला लागेल.

**प्र. सचिव :-**

निवडणूक प्रक्रिया चालू करण्यापूर्वी मा. स्थायी समिती सदस्य नितीन गोपीनाथ ठाकूर ह्यांचा स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनाम्याचा अर्ज आलेला आहे तो स्विकारावा लागल्यामुळे त्यांना आताच्या मतदानात भाग घेता येणार नाही. राजीनामा प्राप्त झाल्यामुळे मला कारवाई करावी लागेल.

**आसिफ शेख :-**

मला वाटते, सन्मा. सचिव साहेब ह्यांनी जी माहिती दिली, ती अत्यंत दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. त्यांच्या माहितीशी सभागृह सहमत नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३ अन्वये, एखाद्या समितीच्या सदस्याने राजीनामा दिला तर तो राजीनामा सन्मा. आयुक्त साहेबांच्या समक्ष जावून द्यायचा असतो आणि आयुक्तांनी तो तातडीने मंजूर करावयाचा असतो. सचिव साहेबांकडे राजीनामा दिला तर सचिवांना ते मान्य करण्याचे कोणतेही अधिकार नाही. अधिनियमात ते स्पष्ट म्हटलेले आहे. आयुक्त साहेबांना राजीनामा दिल्यानंतर ते तातडीने लगेच मंजूर होत असते. सभागृहात राजीनामा देण्याची अधिनियमात तरतुद नाही आहे, असे मला वाटते. त्यामुळे सन्मा. सदस्य नितीन ठाकूर ह्यांना आपण मतदानापासून वंचित करू शकत नाही.

**प्र. सचिव :-**

अधिनियम कलम २३ वाचून दाखवतो.

**आसिफ शेख :-**

कलम २३ बोललो आहे, एक, दोन असे काहीच बोललो नाही.

(प्र. सचिवांनी कलम २३ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

ही फक्त राजीनामा दिल्यानंतरची प्रक्रिया आहे.

**आसिफ शेख :-**

राजीनामा देण्याची पद्धत काय? कलमामध्ये आपण बघा. राजीनामा आयुक्त साहेबांच्या समक्ष द्यायचा असतो.

**अशोक पाटील :-**

सचिवजी, माळी साहेब राजीनामा स्विकारण्याची नेमकी प्रक्रिया काय आहे?

**आसिफ शेख :-**

राजीनामा ह्या सभागृहात प्राप्त झालेला आहे आणि त्याची पुढील कार्यवाही सचिव साहेबांनी सभापतींमार्फत आयुक्त साहेबांकडे प्रस्तावित करायची असते. आपण परस्पर आपल्याला सचिव साहेब तसे अधिकार नाही, सदस्यांचा राजीनामा मंजूर करायचा. हे सभागृह आहे. सभागृहात सभागृहाचे कामकाज चालते.

**बी. एम. माळी :-**

महापालिकाच्या सदस्यांनी जर आपल्या पदाचा राजीनामा द्यायचा असेल तर तो आयुक्त साहेबांकडे द्यायला पाहिजे, अशी तरतुद आहे.

**आसिफ शेख :-**

तरतुदी वाचून दाखवा.

**मोहन पाटील :-**

अशी तरतुद असेल की, राजीनामा सचिवांनी मंजूर करायचा तर ती तरतुद वाचून दाखवा.

**आसिफ शेख :-**

आपण विनाकारण सभागृहाची दिशाभूल करू नका. तरतुद काय आहे. राजीनामा देण्याची रित म्हटले आहे अधिनियमामध्ये, ती रित कोणाची आहे?

**बी. एम. माळी :-**

कोणत्याही पालिका सदस्यांने, कोणत्याही वेळी आयुक्तांना लेखी नोटीस देवून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. अशी नोटीस देण्यात आल्यावर त्याच्यानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

**आसिफ शेख :-**

कोणत्याही पालिका सदस्याला आयुक्तांना लेखी नोटीस देवून, ह्याचा अर्थ काय झाला की, आयुक्तांना .....

**बी. एम. माळी :-**

नगरपालिकेचा सदस्य जो आहे म्हणजे नगरपालिकेचा सदस्य, स्थायी समितीचा सदस्य नव्हे. स्थायी समिती सदस्याचा राजीनामा सचिव स्विकारतात.

**आसिफ शेख :-**

कलम २३ मध्ये काय म्हटले आहे. राजीनामा कोणाला द्यायचे आहे असे म्हटले आहे.

**बी. एम. माळी :-**

२३ मध्ये राजीनामा झाल्यानंतरची गोष्ट आहे.

**आसिफ शेख :-**

राजीनामा कोणाला द्यायचा असे कलम २३ मध्ये म्हटले आहे.

**बी. एम. माळी :-**

स्थायी समिती सदस्याची स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला तर कोणाकडे देणार, सचिवांकडे देणार.

**आसिफ शेख :-**

आपण कलम २३ वाचा.

**प्र. सचिव :-**

कलम २३ मध्ये राजीनामा नंतरची प्रक्रिया आहे.

**आसिफ शेख :-**

राजीनामा नंतर द्यायचे असे कलम २३ मध्ये तरतुद आहे. राजीनामा द्यायच्या पुर्वीची तरतुद काय आहे की कोणत्याही सदस्याला आपल्या पदाचा राजीनामा द्यायचा असेल तर त्याने आयुक्त साहेबांना लेखी नोटीस द्यायला पाहिजे आणि आयुक्त साहेबांनी ते ताबडतोब त्या दिवसापासून ते आपोआपच बंद होते.

**प्र. सचिव :-**

नगरसेवक पदाचा राजीनामा आयुक्त साहेबांकडे द्यायचा असतो.

**आसिफ शेख :-**

पण तरतुदमध्ये काय म्हटले आहे.

**नितीन ठाकूर :-**

सचिव साहेब, स्थायी समिती सदस्यांचा राजीनामा कोणाकडे सुपुर्द करायचा ते आपण वाचून सांगा.

**आसिफ शेख :-**

मी पहिलेच बोललो आहे की, आजची ही सभा महत्त्वाची सभा आहे. या सभेनंतर बरेच काही घडामोडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मला वाटते सभागृहात राजीनामा न देता तो आयुक्त साहेबांकडे दिला तर बरे.

**बी. एम. माळी :-**

महापालिकेचे जे राजीनाम्याचे प्रोसिजर आहे. त्यात जे राजीनाम्याचे सरक्युलर आहे ते असे आहे की,महापौरांना राजीनामा द्यायचा असेल तर मा. महासभेसमोर सादर करावा लागतो. महापालिका सभेपुढे द्यावे लागते. नगरपालिका सदस्यांनी आयुक्तांकडे द्यायला पाहिजे अशी तरतुद आहे. पण स्थायी समिती सदस्यांनी राजीनामा सचिवांकडे सभेमध्ये द्यावा अशी कुठेही तरतुद नाही. तसेच, दुसेर असे आहे की स्थायी सदस्याचे नॉमिनेशन पत्र कोण स्विकारतो, तर सचिव स्विकारतात. मग सचिव हा रिटनिंग ऑफीसर आहे.

**आसिफ शेख :-**

सचिव हा रिटनिंग ऑफीसर आहे. पण आता निवडणूकीची प्रक्रिया सुरू झालेली आहे. सभागृहात अशी कोणत्याप्रकारे राजीनामा देण्याची तरतुद आहे ती आपण आम्हाला दाखवा, असे आम्ही म्हणतोय आणि जर मला राजीनामा द्यायचा आहे तर तो राजीनामा मी सभागृहात देवू शकतो का? मला जर राजीनामा द्यायचा असेल तर मी आयुक्त साहेबांकडे जावून राजीनामा देईल. महापालिका सभागृहात जर आयुक्त साहेब अनुपस्थित असतील तर उपायुक्त मुख्यालयांकडे राजीनामा द्यायला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

कायद्यामध्ये जी काही तरतुद असेल ती आपण सांगा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य नितीनजी ठाकूर ह्यांच्या भावनांशी आम्ही सहमत आहोत, की त्यांना राजीनामा द्यायचा आहे. पण राजीनामा देण्याची आपल्या अधिनियमात जी तरतुद आहे, त्या तरतुदीप्रमाणे सन्मा. सदस्यांनी आयुक्तांकडे राजीनामा द्यायला पाहिजे. जर आयुक्त साहेब अनुपस्थित असतील तर उपायुक्त (मु.) ह्यांच्याकडे राजीनामा द्यायला पाहिजे आणि तो राजीनामा प्राप्त झाल्यानंतर....

**नितीन ठाकूर :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेखजी आपण चुकीचे बोलता, स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा द्यायचा असेल तर स्थायी समितीच्या सभेमध्ये सचिवांकडे देवू शकतो. अशी कायद्यात तरतुद आहे अशी माहिती मला सचिवांनी स्वतः दिलेली आहे.

**आसिफ शेख :-**

मला वाटते सचिवांनी आपल्याला जी माहिती दिलेली आहे, ती चुकीची माहिती दिलेली आहे. अधिनियमात कोणत्याही प्रकारे तशी तरतुद नाही. अधिनियमात स्पष्ट म्हटले आहे की, पालिका सदस्याला जर आपल्या पदाचा राजीनामा द्यायला असेल तर तो त्यांनी आयुक्त साहेबांकडे द्यायला पाहिजे, लेखी नोटीस द्यायला पाहिजे ती आयुक्त साहेबांच्या समक्ष द्यायला पाहिजे आणि सदस्यांच्या बाबतीत आपण २३ कलमान्वये जर आपण बघितले तर त्यामध्ये तसे स्पष्ट म्हटले आहे ना! ती पुढची पद्धत आहे राजीनामा प्राप्त झाल्यानंतर.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सभापती महोदय, जर दिलेल्या राजीनाम्यावर अशी तरतुद जर असेल तर आपण त्याचा खुलासा करावा.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, सन्मा. सदस्य नितीन ठाकूर ह्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला आहे, ह्याच्यावर सभागृहाची भावना लक्षात घेता तडकाफडकी निर्णय घेवू नये. त्यांना थोडेसे विचार करण्याची संधी द्यावी. त्यांनी कुठल्याही विक्षीप्त मनःस्थितीत जर ते राजीनामा देत असतील तर त्यांना संधी द्यावी. आजच्या सभेमध्ये आपण हा विषय घेवू नये. त्यांना थोडीशी संधी देण्यात यावी अशी मी विनंती करतो.

**मा. सभापती :-**

ह्याच्यामध्ये तेच सांगू शकतील. राजीनामा द्यायचा किंवा नाही.

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब, सन्मा. सदस्य अशोक पाटील हे माझे मित्र आहे. आपण माझा मेडिकल चेकप, मेन्टली चेकप करावा अशी विनंती करतो.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सदस्य नितीन ठाकूर आपण तसा समज करून घेवू नका. मानसिक संतुलन नाही तर विक्षीप्त परिस्थिती.

**नितीन ठाकूर :-**

विक्षीप्त मनःस्थिती अजिबात नाही आहे. स्वखुशीने दिलेला राजीनामा आहे.

**आसिफ शेख :-**

ह्यांनी जो राजीनामा दिलेला अहो तो संपूर्ण विचारांती राजीनामा दिलेला आहे, त्यांच्या भावनांशी आम्ही सांगितले की, आम्ही सहमत आहोत. परंतु जी कायदेशीर तरतुद आहे तर त्या कायदेशीर तरतुदीचा आपण कुठेतरी अवलंब व्यवस्थित पद्धतीने केला पाहिजे मला असे सांगायचे आहे. नितीन ठाकूर हे आमचे चांगले मित्र आहे, आमचे चांगले सहकारी आहेत आणि त्यांच्या भावनांशी आम्ही सहमत आहोत मी स्वतः सहमत आहे. त्यात दुमत राहणारच नाही. पण ते अधिनियमाला अनुसरून आपण योग्य ती कार्यवाही केली पाहिजे.

**मोहन पाटील :-**

सचिवजी आपण खुलासा करून आपण योग्य तो निर्णय घ्यावा.

**रिटा शाह :-**

मला असे वाटते की, क्लिअर कट त्याच्यावर काही नियम नाही तर असे करा की, स्थायी समिती सदस्यांचे मतदान घ्या की, नितीन ठाकूरला आम्हाला फेटाळायचे आहे की घ्यायचे आहे. मेजोरिटीने आम्ही सांगतो की, आम्हाला असा सदस्य पाहिजे.

(दु. १२.१५ वा. सभागृहात शांतता.)

(दु. १२.३० वा. सभागृहात मतदान प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली. तसेच मतदान करण्याबाबतच्या सुचनांचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी मा. स्थायी समिती सभापतींच्या ठरावाचे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ९३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००४-२००५ करिता मा. सभापती स्थायी समिती या पदावर नेमणूक करणेबाबत.

**ठराव क्र. :-**

प्रकरण क्रमांक ९३ पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००४-२००५ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणूक करावयाची आहे.

या नेमणूकीसाठी निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत नामनिर्देशन पत्र मागविली असतां,

१) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र

२) श्री. पाटील मोहन मधुकर

यांनी त्यांची नामनिर्देशनपत्रे दाखल केली होती.

वरील दोन उमेदवारांपैकी दिनांक १५/०९/२००४ रोजी निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत आणि स्थायी समितीच्या सभेत निवडणुक प्रक्रियेस प्रत्यक्ष सुरुवात होणे अगोदर कोणीही आपली उमेदवारी मागे न घेतल्याने सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदांन घेण्यांत आले.

त्यावेळी **१) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र** यांना **०४** इतकी मते आणि **२) श्री. पाटील मोहन मधुकर** यांना **११** इतकी मते मिळाली. पैकी **श्री. पाटील मोहन मधुकर** यांना सर्वाधिक मते मिळाली असून ते विजयी झालेले आहेत.

तरी **श्री. पाटील मोहन मधुकर** यांची सन २००४-०५ सालाकरीता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी जाहिर करीत आहे.

**ठराव मतदानाद्वारे मंजुर**

**सही/-**
**पिठासन अधिकारी,**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

एक सूचना देण्यात येते की, मतदान प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर श्री. आसिफ गुलाब शेख ह्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. हा राजीनामा त्यांनी मतदानानंतर दिलेला आहे.

**अशोक कुमार रणखांब (मा. उपायुक्त सो.) :-**

आज या ठिकाणी आपल्या स्थायी समितीच्या सभापतींची निवड प्रक्रिया पुर्ण झाली. आपल्या स्थायी समितीच्या कामकाजामध्ये सभापती असताना आपले सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स साहेब, ह्यांचा आणि माझा संबंध फार थोडा आला. पंरतु त्यांनी चांगल्या प्रकारचे सहकार्य केले आणि त्यांच्याकडे चांगल्याप्रकारची सभा चालविण्याची हातोटी आहे. या आजच्या शेवटच्या प्रसंगी आज निवडणुकीचा त्यांचा शेवटचा दिवस होता, त्याप्रसंगी त्यांनी आम्हाला जे प्रशासनाला सहकार्य केले त्याबद्दल प्रशासनातर्फे मी त्यांचे आभार मानतो आणि त्यांना पुष्पगुच्छ देतो. त्याचप्रमाणे नवनिर्वाचित सभापती मा. मोहन पाटील ह्यांची याठिकाणी निवड झाली व प्रशासनाच्यावतीने एवढेच अॅश्युरन्स देतो की, चांगल्या पद्धतीने काम करू आणि आपल्या सहकार्याने निश्चितपणे मिरा भाईंदरच्या शहरामध्ये विशेष बदल घडवून आणू अशी आम्ही त्यांना ग्वाही देतो आणि त्यांच्या कारर्कीदीला आम्ही शुभेच्छा व्यक्त करतो आणि त्यांना पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत करतो.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी आपण आम्हाला निवडून दिल्याबद्दल मी सर्व सन्मा. सदस्यांचे आभार व्यक्त करीत असून या शहराचे प्रथम नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट जॉन मेन्डोंसा साहेब ज्यांनी ह्या शहराचा विकास जो घडविला आहे आणि त्या विकासाची पुर्णपणे माहिती नव्हे, तर त्या शहराचा कायापालट आपल्या प्रत्येक या शहराच्या रहिवाशांच्या पर्यंत पोहचलेला आहे. आज श्री. मॉरस रॉड्रीक्स माजी सन्मा. सभापती ह्यांनी मला जो पदभार दिला

त्यावेळी मला थोडेसे असे वाटले की, मॉरस रॉड्रीक्सजी ज्यावेळेला मी त्यांना जो पदभार दिला होता आणि तो पदभार दिल्यानंतर त्यांनी प्रशासनाबरोबर आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व नगरसेवकांबरोबर ज्या पद्धतीने खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आपले काम करण्यामध्ये कुठे कसुरता त्यांनी दाखविली नाही आणि प्रत्येक सन्मा. सदस्यांचा त्यांनी मान ठेवून मला ही त्यांनी पुरेपुर बोलण्याची संधी दिली आणि नविन राजकीय क्षेत्रामध्ये त्यांची कालमर्यादा कमी असताना, पण अनुभव फार मोठा असल्याकारणाने त्यांनी चांगल्या पद्धतीने सर्व सदस्यांना हाताळले आणि सभापती पदी विराजमान झाल्यानंतर त्यांना मी आपल्या सर्वांच्यावतीने शुभेच्छा व्यक्त करतो आणि ह्यापुढे आपण माजी सभापती ह्या नात्याने या सभागृहास चांगले सहकार्य कराल आणि आम्हाला सहकार्य द्याल अशी मी अपेक्षा या सर्वांच्यावतीने या ठिकाणी व्यक्त करतो. तसेच, या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास कामाच्या बाबतीमध्ये पहिला जो बहुमान मला ह्या महापालिकेचा अर्थसंकल्प ठेवण्याचा जो बहुमान मला या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व सन्मा. सदस्यांनी त्याचप्रमाणे आदरणीय नेते गिल्बर्ट जॉन मेन्डोंसा साहेब, आपल्या ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महापौर मॅडम मायरा मेन्डोंसाजी आणि सध्याचे तत्कालिन उपमहापौर मुझफ्फर हुसैनजी आणि कॉंग्रेसचे आमचे सर्व सहकारी नगरसेवक, नगरसेविका, विरोधी पक्षनेते, सभागृह नेते ह्यांनी जे मला चांगले सहकार्य केले आणि या शहरामध्ये आपण जी पद्धत अवलंबिली त्या पद्धतीला अनुसरूनच ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचा जो राज्यकारभार आहे हा चांगल्या पद्धतीने चालू आहे. अनेक वेळा वृत्तपत्रातून ज्या बातम्या येतात त्या बातम्यांच्या अनुषंगाने कुठेही प्रशासन बिलकूल ढासळले नाही. विरोधी पक्ष संपूर्ण खंबीरपणे उभा राहिला. सत्ताधारी पक्षाने अशा काही गोष्टींना जास्त भिऊन किंवा त्यांचा नोंद घेउन आपला राज्यकारभार आणि मिरा भाईंदर शहराचा विकास चांगल्या पद्धतीने घडविला त्याबद्दल त्यांनी मी धन्यवाद देवू इच्छितो आणि ह्या पुढे मी माझ्या सहकार्यांच्यावतीने आणि जे सहकारी ह्या स्थायी समितीमध्ये आहे त्यांच्या सर्वांच्या सहकार्याने या शहराच्या विकासाच्या दृष्टिकोनातून जो कायापालट करण्याचा जो मनोदय मी ठरविला आहे. त्या मनोदयास संपूर्णपणे प्रशासनाचे आयुक्त, उपायुक्त, सचिव आपले असलेले सर्व इंजिनिअर, सर्व विभागाचे अधिकारी, अंकाउंट सेक्शन ह्यांचे मला पुर्ण सहकार्य लाभले अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि आज आपण मला पुर्नश्च येथे विराजमान केल्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो आणि आपल्या ज्या अडीअडचणी असतील, त्या अडीअडचणी प्रथम सोडविण्याचा मी प्रयत्न करीन. प्रशासनाचा आणि आपला सुसंवाद साधेन आणि प्रशासनामध्ये आणि आपल्यामध्ये कधी कोणत्याही बाबतीमध्ये अडचण निर्माण होणार नाही ह्याची प्रामुख्याने नोंद घेईन आणि मला माझा विश्वास आहे की अधिकारी वर्ग ज्या पद्धतीने नगरपालिकेपासून महानगरपालिकेपर्यंत त्यांनी ह्या समितीला चांगले सहकार्य केले. समिती ही आपल्या बरोबर राहिली, अशापद्धतीने आपण चांगला राज्यकारभार करून ह्या शहराचा विकास ह्या महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये चांगल्या पद्धतीने मॅसेज देण्याचे मी काम आपल्या सर्वांच्यावतीने करेन असा विश्वास मी आपल्याला देतो आणि पुर्नश्च आदरणीय गिल्बर्ट जॉन मेन्डोंसा साहेब प्रथम नगराध्यक्ष तसेच मा. महापौर मॅडम, उपमहापौर, सभागृह नेते, विरोधीपक्ष नेते आणि सर्व सन्मा. सदस्यांचे या ठिकाणी आभार व्यक्त करून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र !

**रिटा शाह :-**

मा. सभापती साहेब, तसेच नवनिर्वाचित सभापती साहेब, प्रथम मा. नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट जॉन मेन्डोंसा, मा. महापौर श्रीम. मायरा मेन्डोंसा ह्यांच्या प्रयत्नाने खेळीमेळीच्या वातावरणात सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांची सभापती म्हणून निवड झाली. त्याबद्दल मी त्यांचे आणि मोहन पाटील ह्यांचे हार्दिक अभिनंदन करत आहे. तसेच मागच्यावेळी जी स्थायी समितीची सभा झाली तेव्हा ही मा. शंकर पिठला साहेब, हरीश रोघे साहेब, मा. महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेस माजी अध्यक्ष मुझफ्फर हुसैन साहेब त्यांच्या प्रयत्नाने स्थायी समिती सदस्य आणि स्थायी समिती अध्यक्ष म्हणून श्री. मॉरस रॉड्रीक्स साहेब हे ही खेळीमेळीच्या वातावरणातून निवडून आले होते आणि आता ही सन्मा. सदस्य मोहन पाटील हे खेळीमेळीच्या वातावरणात निवडून आलेले आहे आणि मला दुसरे नगरसेवकांबद्दल बोलावेसे वाटते की, खेळीमेळीच्ये वातावरण निर्माण करून दोन नगरसेवकांनी स्थायी समिती सदस्य म्हणून राजीनामा दिलेला आहे. ते ही खेळीमेळीच्या वातावरणातच केलेले आहे, त्याबद्दल धन्यवाद.

**हॅरल बोर्जीस :-**

आदरणीय सभापती महोदय, आजच्या ह्या सन २००४-०५ वर्षासाठी स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक चांगल्या पद्धतीने पार पाडली, ह्या निवडणूकीमध्ये आमचे ज्येष्ठ सदस्य आणि विद्यमान सभापती श्री. मोहन पाटील ह्यांची पुन्हा एकदा सभापती पदावर नेमणूक झालेली आहे.

आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व नगरसेवकांच्यावतीने, सहकारी पक्ष काँग्रेस, भाजपा, शिवसेना, आघाडी या सर्व पक्षाच्या नगरसेवकांच्यावतीने मी आपले अभिनंदन करतो आणि शहराच्या आपल्याकडून ज्या काही समस्या, अडीअडचणी आहेत, आगामी वर्षामध्ये सर्व समस्यांना चांगल्याप्रकारे आपण सहकार्य करून त्या समस्या सोडविण्यासाठी आपण आपले मार्गदर्शन आपले संपूर्ण ह्या शहरासाठी द्याल अशी आम्ही अपेक्षा बाळगतो आणि आगामी वर्षाकरिता आपणाला शुभेच्छा व्यक्त करतो व पुन्हा एकदा आपणाला अभिनंदन करुन माझे दोन शब्द पुर्ण करतो. धन्यवाद.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मावळते सभापती साहेब मॉरसजी रॉड्रीक्स ह्यांनी जसे त्यांच्या कारर्कीदीमध्ये कुठलाही पक्षभेद न ठेवता सभासदांच्या सूचना, मागण्या मान्य करून या मिरा भाईंदर शहराच्या विकासाला हातभार लावला. तशाचप्रकारे नवनिर्वाचित सभापती साहेब ह्यांनी कुठलाही पक्षभेद न करता सदस्यांच्या मागण्यांचा विचार करून मिरा भाईंदर नगरपालिकेच्या विकासाला हातभार लावतील अशी अपेक्षा करतो आणि त्यांना शुभेच्छा देवून मी माझे दोन शब्द संपवितो.

**अशोक पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पहिल्याच टर्ममध्ये दुसऱ्यांदा सभापती पदी स्थायी समितीच्या सभापती पदी विराजमान झालेले राष्ट्रवादीचे मोहन पाटील ह्यांचे शहर विकास आघाडीतर्फे हार्दिक अभिनंदन आणि मागील सभापती पदाचा अनुभव आणि नगरपालिका अस्तित्वात असताना देखील भूषवलेल्या सभापती पदाचा पाठीमागे असलेला अभ्यास व अनुभव ह्या सर्वांचा त्यांचा एकंदरीत यापुढील वर्षाच्या कारकीर्दीमध्ये ते उपयोग करून घेतील आणि ह्या शहराचा विकास करण्यामागे ते आपला जास्तीत जास्त वेळ खर्चीत करतील आणि त्याबद्दल त्यांना पुर्ण स्वायत्ता लाभेल अशी अपेक्षा बाळगून मी त्यांचे पुन्हा अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र !

**अनंत पाटील :-**

सभापती महोदय, मॉरसजी रॉड्रीक्स ह्यांच्या कारर्कीदीमध्ये सर्व कामकाजामध्ये मॉरसजी रॉड्रीक्स ह्यांनी आम्हाला सहकार्य दिलेले आहे आणि त्याचबरोबर आता जे नवनिर्वाचित सभापती मोहनजी पाटील ह्यांना प्रशासनाचा चांगला अनुभव असलेले, सर्वांना एकत्रित घेवून जाणारे आणि प्रशासनावर अंकुश ठेवून जी जी विकासाची कामे आहेत, ती विकासिक कामे मिरा भाईंदर रहिवाशांना चांगल्या तऱ्हेने हाताळू शकतील अशी मी अपेक्षा करतो आणि ह्याबाबत मोहन पाटील आणि इतर सर्व सहकारी ह्यांनी जी मोहन पाटील ह्यांची निवड केलेली आहे. आम्ही या शिवसेनेच्यावतीने मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो आणि भविष्यात त्यांना चांगले दिवस लाभो, अशी अपेक्षा व्यक्त करून मी रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नवनिर्वाचित मोहन पाटील दुसऱ्यांदा सभापती झाले, आमचे आमदार मुझफ्फर हुसैन साहेब, तसेच उपमहापौर वैती साहेब आणि मी, मॉरस रॉड्रीक्स सन्मा. सभापती मोहन पाटील ह्यांना आमच्या शुभकामना, शुभेच्छा देतो. तसेच, आमच्या सर्व नगरसेवकांच्या ही शुभकामना देतो.

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.०५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**